* माहिती *

# वाशिम जिल्हा पोलीस दल

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

दिनांक :– ०१/०४/२०१९

***मा.पोलीस अधिक्षक श्री. वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हयात अवैध धंदयाविरुध्द कार्यवाही, तसेच महिला,विदयार्थीनी यांचे सुरक्षिततेकरीता, त्वरीत प्रतिसाद देणाऱ्या निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली.***

मा. पोलीस अधिक्षक श्री.वसंत परदेशी यांनी पोलीस अधिक्षक पदाचा स्विकारताच कायदयाचे उलंघन करणारे व्यक्ती विरुध्द कारवाईचा धडाका सुरु केला आहे. आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक २०१९ मध्ये कोणताही अनुचित प्रकार घडु नये यासाठी संपुर्ण जिल्हयामध्ये विशेष मोहिम हाती घेतली असुन वेगवेगळया सदराखाली मोठया प्रमाणात कारवाई करण्यात येत आहे.

विशेष मोहिमे अंर्तगत वाशिम जिल्हयातील अवैध दारू विक्रेते, अवैध जुगार खेळणारे इसमांविरुध्द कारवाई करण्यात येत आहे. आचार संहितेचे उल्लंघन होवु नये म्हणुन विशेष मोहिमे अंतर्गत वाशिम जिल्हयातील अभिलेखावरील पाहिजे फरार आरोपी अटक करणे, मा. न्यायालयाकडुन प्राप्त झालेल्या समन्स/वॉरंट बजावणी करणे या सारखे उपक्रम राबविण्यात आले.

महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता/वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी विशेष निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली असुन महिला बिट मार्शल व निर्भया पथकाला दिनांक २९/०३/२०१९ रोजी मा. श्री विनय कारगांवकर साहेब अप्पर पोलीस महासंचालक, महामार्ग, मुंबई, यांनी हिरवी झंडी दाखविली. सदर पथकात पोलीस हवालदार सुषमा कसले,कांता बेलखेडे, मपोशि वंदना इंगोले, अर्चना चव्हाण, अनिता श्रुंगारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हयातील पिडीत महिला, शाळा कॉलेजच्या विदयार्थीनी यांना आवश्यकता भासल्यास नियंत्रण कक्ष वाशिम येथे ०७२५२२३४८३४ या क्रमांकावर संपर्क करुन निर्भया पथकाची तात्काळ मदत मिळविता येईल.

जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी अवैध धंदाविरूद्ध सुरू केलेली मोहिम अधिक तिव्र केली असुन सदर बाबत नागरिकांमध्ये सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तसेच मतदान प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत ऑल आऊट ऑपरेशन,नाकाबंदी अशाप्रकारच्या मोहिम दररोज राबविण्यात येणार आहेत. तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपणास काही आक्षेपाहर्य आढळल्यास त्याबाबत आपण निसंकोच पणे नियंत्रण कक्ष वाशिम येथे माहिती कळवावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

1/04/19

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा,वाशिम